# गुणात्मक अन्वेषणासाठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न माहे नोव्हेंबर – २०१८

## १) गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष ३, गु.अ.वि; मुंबई

| | | |
|---|---|---|
| १ | **गु.र.क्र व कलम** | गुप्रशा; गुरक्र. ७८/२०१८ कलम ३९४,३९७,३४,१२०(ब) भा.दं.वि.<br>(ना.म.जोशी मार्ग पोलीसठाणे गुरक्र.१९०/२०१८) |
| २ | **गुन्हा घडला दिनांक** | दिनांक २७/१०/२०१८ रोजी १७.०० ते २०.१५ वा.चे दरम्यान |
| ३ | **गुन्हयाचे ठिकाण** | मथुरादास मिल कंम्पाऊंड, लोअर परेल, मुंबई |
| ४ | **फिर्यादी** | श्री.मुकेशकुमार रामलाल बुखर, वय ३२ वर्षे, रा.ठि.९/३/अे, बि.नं.२९९, गोदरेज बिल्डिंग, दुसरा माळा, काळबादेवी, मुंबई |
| ५ | **गुन्हयातील चोरीस गेलेली मालमत्ता** | रू. १,३३,६५,९८८/– सोन्याचे व हि–याचे दागिने. |
| ६ | **हस्तगत मालमत्ता / हत्यार** | १) १,२७,९२,१७६ /– सोन्याचे व हि–याचे दागिने.<br>२) गुन्हयात वापरलेला मोबाइल.<br>३) गुन्हयात वापरलेले हत्यार. |
| ७ | **आरोपी अटक** | १) सुरेश अशोक डोके वय ३६,<br>२) महेंद्र प्रकाश चौधरी उर्फ मारवाडी उर्फ गुरबित वय २३,<br>३) सतीश फकीरा सानप उर्फ सत्या वय २९,<br>४) विलास हनुमंत पवार उर्फ मामा वय २५<br>**अटक दिनांक ११/११/२०१८** |
| ८ | **तपासी अधिकारी** | पोलीस निरीक्षक संजय देवराम निकुंबे |

❖ यातील फिर्यादी श्री.मुकेशकुमार रामलाल बुखर, वय ३२ वर्षे, रा.ठि.९/३/अे, बि.नं.२९९, गोदरेज बिल्डिंग, दुसरा माळा, काळबादेवी, मुंबई हे ''ग्लोबल लॉजिस्टिक'' या कंपनीत नोकरीस आहेत. सदर कंपनी मार्फत फिर्यादी हे वेगवेगळया सोन्याचे दागीने बनविणाऱ्या कारखान्यांमधून सोन्याचे दागीने व कागदपत्रांचे कुरीअर पार्सल स्विकारुन त्याची डिलीव्हरी करण्याचे काम करतात. दिनांक २७/१०/२०१८ रोजी १७.०० ते २०.१५ वा.चे दरम्यान फिर्यादी यांनी नेहमीप्रमाणे लोअरपरेल परिसरातील सोन्यांचे दागिने बनविण्याच्या विविध कारखान्यातून सोन्याचे व हिऱ्यांच्या दागीन्यांचे पार्सल ताब्यात घेवून त्यांच्याकडील बॅगेत ठेवली. त्यानंतर फिर्यादी हे शेवटचे पार्सल घेण्यासाठी मथुरादास मिल कंम्पाऊंड, लोअर परेल, मुंबई येथे जात असताना, मथुरादास मिल कंम्पाऊंडच्या गेटवर एका इसमाने त्यांना घटट् पकडून, दुसऱ्या इसमाने त्यांच्या डोळयात मिरची पावडर टाकून तोंड दाबून फिर्यादीकडील सोन्याचे हिरेजडीत दागीने असलेली बॅग जबरीने हिसकावण्याचा प्रयत्न करु लागले. त्यावेळी फिर्यादी यांनी बॅग घटट् पकडून ठेवल्याने आरोपीने फिर्यादी यांचेवर धारदार शस्त्राने वार करुन व दागिन्यांचे बॅगेचा पटट्ा कापून ती जबरीने चोरली. सदर गुन्हयात एकुण रु.१,३३,६५,९८८/– इतक्या किंमतीच्या सोन्याचे दागिने जबरीने चोरुन नेल्याचे निष्पन्न झाले आहे.

❖ गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष ३, गु.अ.वि; मुंबई चे पथकाने नमुद गुन्हयाची माहिती मिळताच गुन्हयाचा तपास सुरू केला. पोलीस निरीक्षक संजय देवराम निकुंबे यांनी फिर्यादी यांचेकडून संपुर्ण घटनाक्रम समजुन घेतला. पो.ह. क.२८४१६/अशोक भास्कर राणे, पो.शि.क्र.०६.१९३४/भास्कर भिमराव गायकवाड व पथकाने घटनास्थळाचे अत्यंत बारकाईने निरीक्षण केले. घटनास्थळ व आजुबाजुच्या परीसरात कोणत्याही आस्थापानाचे परीसरात सिसिटिव्ही कॅमेरे आहेत का याबाबत तपास केला. पो.शि.क्र.०६.१९३४/गायकवाड

यांनी गुन्हयाचे दिवसापासून घटनास्थळ व परिसरातील फिर्यादीच्या दिवसभराच्या प्रत्येक हालचालींबाबतचे सीसीटिव्ही फुटेज प्राप्त करण्या करीता सतत पाठपुरावा केला व सुमारे ३५ ठिकाणचे सीसीटिव्ही फुटेज प्राप्त केले.

❖ सदर पथकाने सीसीटिव्ही फुटेजची बारकाईने परिक्षण व पाहणी करुन फिर्यादी व आरोपीतांचे घटनेच्या वेळेचे संबंध जुळवून तपास केला. जबरी चोरीस गेलेल्या मालमत्ता धारक व्यापाऱ्यांकडे सविस्तर तपास करुन दिवसभरातील प्रत्येक व्यवहाराबाबत माहीती प्राप्त केली. तसेच डमडाटा द्वारे प्राप्त सुमारे १००० मोबाईल क्रमांकामधून सीडीआर परिक्षण केले व घटनेच्या वेळेचे गणित जुळवून संशयीत मोबाईल नंबर तयार केले.

❖ गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष ३, गु.अ.वि; मुंबई यांनी नमुद गुन्हयाचे तपासाचे अनुषंगाने अधिक खात्रीलायक माहिति प्राप्त व्हावी याकरीता गुन्हयातील आरोपी यांनी गुन्हा केल्यानंतर त्याचे मोबाईल फोन बंद करुन, ते पुणे, सातारा, संगमनेर, नाशिक नवी मुंबई या परिसरात फिरत होते. सदर आरोपींची गोपनियरित्या माहिति प्राप्त केली. पोनि निकुंबे व पथकाने तात्काळ प्राप्त पत्तयावर जावून नमुद गुन्हयातील आरोपी नामे १) सुरेश अशोक डोके वय ३६, २) महेंद्र प्रकाश चौधरी उर्फ मारवाडी उर्फ गुरबित वय २३, ३) सतीश फकीरा सानप उर्फ सत्या वय २९, ४) विलास हनुमंत पवार उर्फ मामा वय २५ यांना शिताफीने ताब्यात घेतले. नमुद आरोपीतांचा गुन्हयातील सक्रीय सहीाग निष्पन्न झालेवरून त्यांना सदर गुन्हयात दिनांक ११/११/२०१८ रोजी रितसर अटक करण्यात आली.

❖ पो.नि. निकुंबे व पथकाने ताब्यातील आरोपींकडे नमुद गुन्हयाचे तपासाचे अनुषंगाने कसुन सखोल चौकशी करता, आरोपीतांने सदर गुन्हा केल्याचे कबुल करून दोन लायक पंचासमच केलेल्या निवेदनावरून गुन्हयातील जबरी चोरी झालेल्या रु. १,३३,६५,९८८/– किमतीच्या मालमत्तेपैकी रु.१,२७,९२,१७६/– किंमतीचे सोन्याचे हिरेजडीत दागीने अशी एकुण ९५% मालमत्ता अटक आरोपीतांकडून हस्तगत करण्यात यश प्राप्त केले. तसेच गुन्हयात आरोपीने वापरलेले धारदार शस्त्र, मोबाईल फोन, सिमकार्ड व इतर वस्तू हस्तगत केल्या.

❖ गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष ३, मुंबई चे पथकाने गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष–०३, मुंबई चे पथकाने कोणताही सबळ पुरावा उपलब्ध नसताना मानवी कौशल्य व तांत्रिक तपासचा वापर करून सोन्याचे व हिऱ्यांच्या दागीन्यांचे पार्सल घेवून जाणारे फिर्यादी यांच्या डोळयात मिरची पावडर टाकून त्यांचे तोंड दाबून फिर्यादीकडील सोन्याचे हिरेजडीत दागीने असलेली बॅग जबरीने हिसकावताना फिर्यादी यांचेवर धारदार शस्त्राने वार करुन व दागिन्यांचे बॅगेचा पटट्ा कापून ती जबरीने चोरी करणारे चार आरोपीतांना अथक प्रयत्नाने अटक करून गुन्हयातील जबरीने चोरी केलेल्या मालमत्तेपैकी एकुण ९५% मालमत्ता हस्तगत करून सदरचा गुन्हा उघडकीस आणला आहे. सदर पथक नमुद गुन्हयाचा तपास करून सबळ पुराव्यानिशी अटक आरोपीतांविरूध्द लवकरात लवकर दोषारोप पत्र सादर करीत आहे.

❖ सदरचा गंभीर गुन्हा उघडकिस आणला असल्याने नमुद गुन्हयाची '' **गुणात्मक अन्वेषणासाठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न** '' माहे **नोव्हेंबर – २०१८** या बक्षिसाकरीता शिफारस करण्यात येत आहे.

**<u>गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष ३, गु.अ.वि; मुंबई तपास पथकातील पोलीस अधिकारी/अंमलदार</u>**

| अ.क्र. | अधिकारी/अंमलदार नांव व हुद्दा | अधिकारी/अंमलदार यांची कामगिरी |
|---|---|---|
| १ | प्र.पो.नि. संजय देवराम निकुंबे | **गुन्हयाचे तपास अधिकारी :–** गुन्हयाचे घटनास्थळ व परिसराची कसून पाहणी करुन सतत दिवसरात्र पाठपुरावा करुन सीसीटिव्ही व सीडीआरद्वारे |

| | | |
|---|---|---|
| | | निष्पन्न झालेल्या संशयीतांबाबत तपास करुन मार्गदर्शन केले. वारंवार प्रत्यक्ष हजर राहून संशयीतांना ताब्यात घेवून ०४ आरोपीतांना अटक केली व गुन्हयातील जबरी चोरी झालेल्या सोन्याचे हिरेजडीत दागीने किंमत रु. १,३३,६५,९८८/— किमतीच्या मालमत्तेपैकी ९५ टक्के मालमत्ता रु. १,२७,९२,१७६/— किंमतीचे सोन्याचे हिरेजडीत दागीने हस्तगत केले. आरोपींनी कोणताही दुवा मागे न ठेवता, अत्यंत योजनाबद्ध रितीने केलेला गुन्हा १५ दिवसांत उघडकिस आणला. परिणामतः मुंबई गुन्हे प्रकटीकरण शाखेचे व मुंबई पोलीस दलाचे नाव उज्वल केले. |
| २ | पो.ह. क्र.२८४१६/अशोक भास्कर राणे | घटनास्थळ व परिसरातील मोबाईल डमडाटा प्राप्त केला, सीसीटिव्ही फुटेजची बारकाईने परिक्षण व पाहणी करुन फिर्यादी व आरोपीतांचे घटनेच्या वेळेचे संबंध जुळवून तपास केला. जबरी चोरीस गेलेल्या मालमत्ता धारक व्यापाऱ्यांकडे सविस्तर तपास करुन दिवसभरातील प्रत्येक व्यवहाराबाबत माहीती घेतली. प्रत्येक ठिकाणी आलेल्या व्यक्तींबाबत विचारणा करुन गुन्हा उघडकिस आणण्यात व मालमत्ता हस्तगत करण्यात महत्वाचा सक्रिय सहभाग घेतला. |
| ३ | पो.शि.क्र.०३.७५१/वैभव जनार्दन गिरकर | डमडाटा द्वारे प्राप्त सुमारे १००० मोबाईल क्रमांकामधून सीडीआर परिक्षण केले व घटनेच्या वेळेचे गणित जुळवून संशयीत मोबाईल नंबर तयार केले. जबरी चोरी झालेल्या मालमत्ता धारक व्यापाऱ्यांकडे तपास करुन मालमत्तेबाबत सविस्तर माहीती प्राप्त केली. आरोपीतांचे नंबर नुसार मोबाईल लोकेशन सी.डी.आर. तंत्रज्ञानाचा तांत्रिक अभ्यास करुन त्यांना अटक करुन त्यांचेकडे सखोल तपास केला व मालमत्ता हस्तगत करण्यात व गुन्हा उघडकिस आणण्यात महत्वाचा सक्रिय सहभाग घेतला. |
| ४ | पो.शि.क्र.०६.१९३४/भास्कर भिमराव गायकवाड | गुन्हयाचे दिवसापासून घटनास्थळ व परिसरातील फिर्यादीच्या दिवसभराच्या प्रत्येक हालचालींबाबतचे सीसीटिव्ही फुटेज प्राप्त करण्याकरीता सतत पाठपुरावा केला व सुमारे ३५ ठिकाणचे सीसीटिव्ही फुटेज प्राप्त केले. त्यानुसार जबरी चोरीस गेलेल्या मालमत्ता धारक व्यापाऱ्यांकडून संशयीत इसमांबाबत सविस्तर माहीती प्राप्त करुन प्रत्येक संशयीतास आणून कसून तपास केला. गुन्हयातील आरोपी यांनी गुन्हा केल्यानंतर त्याचे मोबाईल फोन बंद करुन, ते पुणे, सातारा, संगमनेर, नाशिक नवी मुंबई या परिसरात फिरत होते. सदर आरोपींची गोपनियरित्या माहिती प्राप्त करुन त्यांना अटक करुन त्यांचेकडे कौशल्यपूर्ण तपास केला आणि गुन्हयाची उकल करण्यात व मालमत्ता हस्तगत करण्यात महत्वाचा सक्रिय सहभाग घेतला. |

——— ००० ———

## २) माहिम पोलीस ठाणे, मुंबई

| | | |
|---|---|---|
| १ | **गु.र.क्र व कलम** | माहिम पोलीस ठाणे गुरक्र. ३५९/१८ कलम ३०२,३४ भा.दं.वि. |
| २ | **गुन्हा घडला दिनांक** | दिनांक ०८/१०/२०१८ रोजी ००.३० वा. |
| ३ | **गुन्हयाचे ठिकाण** | अमृत डेन्टल लेबॉरेट्री दुकाना समोरील फुटपाथवर, डॉ. रायकर मार्ग, माहीम (प), मुंबई. |
| ४ | **फिर्यादी** | श्री.गिरीश प्रमोद कदम, वय ३५ वर्षे, धंदा नोकरी (पो.शि.क्र.०३१४८), रा.ठी. एम.एच.बी. कॉलनी, बिल्डींग नं. १६, रूम नं. ८२३, दुसरा मजला, सायन पूर्व, मुंबई |
| ५ | **मयत** | एक अनोळखी इसम, वय अंदाजे ४० वर्षे |
| ६ | **गुन्हयातील चोरीस गेलेली मालमत्ता** | —— |
| ७ | **हस्तगत हत्यार** | —— |
| ८ | **आरोपी अटक** | १) मोहम्मद तबरेज आलम नियाज शेख उर्फ आसीफ वय २३ वर्षे<br>२) रवि देवनारायण पासमाल पंडीत वय २५ वर्षे<br>**अटक दिनांक १६/११/२०१८ रोजी** |

❖ माहिम पोलीस ठाणे गुरक्र. ३५९/१८ कलम ३०२,३४ भा.दं.वि. या गुन्हयातील फिर्यादी श्री गिरीश प्रमोद कदम, वय ३५ वर्षे, धंदा नोकरी, (पो.शि.क्र. ०३१४८) हे दिनांक ०७/१०/२०१८ रोजी बीट मार्शल क्र. ०७ या वाहनावर तीसऱ्या पाळी करीता कर्तव्य करित असताना दिनांक ०८/१०/२०१८ रोजी ००.३० वा. दरम्यान फिर्यादी हे कापडबाजार, राममंदीर जवळ गस्त करीत असताना एका इसमाने त्यांना थाबवून अमृत लॅब्रोटरी या बंद दुकानाच्या समोर फुटपाथवर डॉ. रायकर मार्ग माहीम या ठिकाणी एक इसम रक्ताचे थारोळयात जखमी व बेशुध्द अवस्थेत पडला आहे असे सांगितले त्यामुळे फिर्यादींनी तात्काळ वर नमुद ठिकाणी जावून पाहीले असता अंदाजे ४० वर्षाचा इसम रक्ताचे थारोळयात जखमी बेशुध्द अवस्थेत दिसला व त्यांचे डोक्यातुन रक्त स्त्राव होत असलेला पाहीले म्हणुन फिर्यादींनी तात्काळ बिनतारी संदेशा द्वारे मध्य नियंत्रण कक्षास सदर माहीती कळवून व आजुबाजुला जमलेल्या लोकांकडे जखमी इसमाबाबत विचारना केली असता सदर जखमी इसमास कोणीही ओळखले नाही. यावरून सदर जखमी इसम हा रोडसाईड फुटपाथवर राहणारा असावा अशी फिर्यादी व त्याच्या साथीदाराची खात्री झाली. तसेच त्यांनी जमलेल्या इसमाकडे अधिक विचारपूस केली असता त्यापैकी एका इसमाने सांगितले की, सदर जखमी इसमास एका अनोळखी इसमाने त्याच्या डोक्यावर दगड मारताना पाहीले असल्याचे व सदर अनोळखी इसम तेथून पळुन जात असल्याचे त्याने पाहीले आहे असे सांगितले. सदर इसमाने जखमी इसमास डोक्यात दगड मारून पळुन गेलेल्या इसमाचे वर्णन सांगीतले त्यानंतर फिर्यादीने माहीम ३ मोबाईल वाहनातुन जखमी इसमास भाभा रूग्णालय, बाद्रा मुंबई येथे औषधोपचारकामी आणले असता तेथील डॉक्टरांनी त्यास दाखल पूर्व मयत घोषीत केले फिर्यादींनी यांतील अनोळखी आरोपी विरूध्द सरकार तर्फे फिर्याद दिल्याने नमुदप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

❖ सदरचा गुन्हा दाखल झाल्यानंतर व कोणीही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नसताना सदर गुन्हा उघडकीस आणणे जिकरीचे होते. तरी देखील माहिम पोलीस ठाणेचे पोनि. तुकाराम बाळा जगताप, पो.ह.क्र. २४५९३/पोपट कृष्णा आगवणे यांनी संपुर्ण माहिम परिसरातील दारू विक्रीची दुकाने, देशी दारू विक्रीची दुकाने, भिक्षेकरू थांबण्याची ठिकाणी, रेल्वे स्टेशन, मगदुमशहा बाबा दर्गा, रेतीबंदर तसेच इतर भिक्षेकरू

थांबण्याची ठिकाणी व त्यांचा वावर अशा अनेक ठिकाणी अश्या ६५० इसमांना मृत इसमाचा फोटो दाखवून तसेच स्केच काढण्यात आलेल्या इसमाचा फोटो दाखवून गुन्हा उघडकिस आणण्याचे कसोसीने प्रयत्न केले.

❖ माहिम पोलीस ठाणेचे सहा.पोलीस निरीक्षक प्रविण विजय खराडे यांनी पोलीस ठाणे हद्दीतील सरकारी यंत्रणेद्वारे व निमसरकारी असलेल्या एकूण २५ सी.सी.टि.व्हि फुटेज प्राप्त करुन रात्रंदिवस त्यांची पाहणी करुन आरोपीताचा मागोवा घेण्याचा कसोसीने प्रयत्न चालू केला. सदरचा गुन्हा हा एक महिन्यापेक्षा जास्त दिवस उघडकीस येण्याकरीता बाजूस सदर पथकाने आपले खास बातमीदारांचे जाळे पेरले. त्यातील खास बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीनुसार दिनांक १६/११/२०१८ रोजी पथकास मिळालेल्या माहितीवरून पोनि. जगताप, सपोनि. खराडे, पो.ह.क्र. २४५९३/आगवणे, पो.ह.क्र. २६२५०/विलास लहु सितप व पथकाने वेल्कम वेफर्स दुकानाच्या पुढे, सेनापती बापट मार्गावर, मरीअम्मा मंदिराजवळ, माहिम, पश्चिम, मुंबई–१६ येथे सापळा रचून इसम नामे १) मोहम्मद तबरेज आलम नियाज शेख उर्फ आसीफ वय २३, धंदा–वाढीकाम, रा.ठि. माहिम फाटक, सरदार भंगारवाला समोरील फुटपाथ, सेनापती बापट मार्ग, माहिम, पश्चिम, मुंबई–१६ २) रवि देवनारायण पासमाल पंडीत वय २५, रा.ठि. अल्ताफ फर्नीचरवाला बिल्डींग समोरील फुटपाथ, कॅडल रोड, मगदुमशहाबाबा दर्गा शेजारी, माहिम, पश्चिम, मुंबई–१६ यांना जागीच ताब्यात घेतले व पोलीस ठाणेस आणून त्यांच्याकडे गुन्हयाच्या तपासाच्या अनुषंगाने अधिक सखोल तपास केला असता मयत इसमाबरोबर पैशाच्या वादावरून भांडण होवून त्या रागाच्या कारणास्तव मयत इसम हा झोपलेला असता अचानक येवून नमुद आरोपीतांनी संगणमत करून आरोपी मोहम्मद तबरेज आलम नियाज शेख उर्फ आसीफ वय २३ याने मयत इसमाच्या डोक्यात दगड मारून जिवे ठार मारले. अशा रितीने नमुद आरोपीत इसम नामे १) मोहम्मद तबरेज आलम नियाज शेख उर्फ आसीफ वय २३ वर्षे २) रवि देवनारायण पासमाल पंडीत वय २५ वर्षे यांनी गुन्हयाची स्पष्ट कबुली दिल्यावरून त्यांना नमुद गुन्हयात दिनांक १६/११/२०१८ रोजी रितसर अटक करण्यात आली.

❖ माहिम पोलीस ठाणे, मुंबई चे पथकाने कोणताही सबळ पुरावा उपलब्ध नसताना मानवी कौशल्य व तांत्रिक तपासाचा वापर करून पैशाच्या वादावरून भांडण होवून त्याचा राग मनात ठेवून मयताचे डोक्यात दगड मारून निर्घुण खुन करणाऱ्या दोन आरोपीतांना अथक प्रयत्नाने अटक करून सदरचा खुनाचा गंभीर गुन्हा उघडकीस आणला आहे. सदर पथक नमुद गुन्हयाचा तपास करून सबळ पुराव्यानिशी अटक आरोपीतांविरूध्द लवकरात लवकर दोषारोप पत्र सादर करीत आहे.

❖ सदरचा गंभीर गुन्हा उघडकिस आणला असल्याने नमुद गुन्हयाची '' **गुणात्मक अन्वेषणासाठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न** '' माहे **नोव्हेंबर – २०१८** या बक्षिसाकरीता शिफारस करण्यात येत आहे.

**माहिम पोलीस ठाणे, मुंबई तपास पथकातील पोलीस अधिकारी/अंमलदार**

| अ.क्र. | हुद्दा व संपुर्ण नांव | गुन्हयातील सक्रिय सहभाग/भुमिका |
|---|---|---|
| १ | पोलीस निरीक्षक तुकाराम बाळा जगताप | गुन्हयाचा सक्रिय तपास करून आरोपीस अटक केली व तपासात सबळ पुरावा प्राप्त केला |
| २ | सहा.पोलीस निरीक्षक प्रविण विजय खराडे | गुन्हयातील आरोपीस अटक केली व तपासात सबळ पुरावा प्राप्त केला |
| ३ | पो.ह.क्र.२४५९३/ पोपट कृष्णा आगवणे | गुन्हयाचा सक्रिय तपास करून आरोपीस अटक केली व तपासात सबळ पुरावा प्राप्त केला |
| ४ | पो.ह.क्र. २६२५०/विलास लहु सितप | आरोपीस अटक व तपासात सक्रिय सहभाग |